पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ११४
सभावृत्तांत

दिनांक - १३/०५/२०१४ वेळ - सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १३/०५/२०१४ रोजी सकाळी ११.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा. महेशदादा किसन लांडगे - सभापती
२. मा. वाघेरे सुनिता राजेश
३. मा. बारणे माया संतोष
४. मा. कदम सदगुरु महादेव
५. मा. भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा. शेंडगे आशा सुखदेव
७. मा. ओव्हाळ रमा नितीन ऊर्फ सनी
८. मा. गायकवाड संध्या सुरदास
९. मा. भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के.बापू
१०. मा. सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
११. मा. तरस बाळासाहेब जयवंत
१२. मा. विनय ऊर्फ विनायक रमेश गायकवाड
१३. मा. अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१४. मा. प्रसाद शेट्टी

या शिवाय मा.झुरे - सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.गावडे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.फुंदे, मा.दुरगुडे, मा.माछरे, – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.धाडगे – मुख्य लेखापरिक्षक, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.पाटील, मा.तुपे - सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल, डॉ.अनिल रॉय – आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.शरद जाधव, मा.चिंचवडे, मा.साळवी, मा.पठाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.खाबडे, मा.पिरजादे, मा.दांगट, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.कन्हेरे, मा.संजय कांबळे – कार्य.अभियंता, मा.लावंड – कायदा अधिकारी, मा.गावडे – अग्निशामक अधिकारी, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१६) महानगरपालिकेच्या हद्दीतील रुग्णांना मोफत केसपेपर देणेबाबत – मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१७) वाहन क्र.एम.एच.१४ एई ८५०० साठी टायरटयुब खरेदी करणेबाबत – मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१८) बस टर्मिनल/डेपो बांधणेकामी प्रकल्प सल्लागार नेमणूकीबाबत - मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१९) नविन प्रभाग कार्यालयांसाठी नविन फर्निचर खरेदी करणेबाबत – मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२०) जागा उपलब्ध करुन देणेबाबत – मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ५७५० दि.२८/०१/२०१४ मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) अशोक काशिनाथ पवार यांची मनपाच्या आर्कीटेक्ट पॅनलवर नेमणूक करणेबाबत – मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२३) मुदत ठेवीबाबत – मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) सन २०१४-१५ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक – ६७९३ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – मध्यवर्ती भांडार

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०४/कावि/०१/२१४/२०१४ दि. ०२/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाचे विविध विभागास आवश्यक छपाई साहित्य छपाई करणेकामी ई.नि.सु.क्र. ४९/ २०१३-१४ अन्वये प्राप्त झालेल्या बाब क्र.०८, २१, २९, ३०, ४६, ४९, ५६, ५९, व १०० एकुण ०९ बाबी लघुत्तम दरानुसार मे.अमृत मुद्रणालय यांचे बाब क्र.०८, २१, २९, ४६, ५६, ५९ व १०० नुसार एकुण ०७ बाबीसाठी र.रु.६१,०८९/- व मे आशिष एंटरप्रायजेय यांचे बाब क्र.३० व ४९ नुसार एकुण ०२ बाबीसाठी र.रु.३९,१५०/- असे एकुण र.रु. १,००,२३९/- (अक्षरी र.रू.एक लाख दोनशे एकोणचाळीस) चे खर्चास व करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९४ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय
सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.संध्या गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वैद्य/१अ/कावि/२९०/२०१४ दि. ०२/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

**डॉ.श्री.रत्ना दानप्पा, स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ** यांना आकुर्डी रुग्णालयात मानसेवी **स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ** या पदावर आदेशाचे दिनांकापासुन ६ महीने या कालावधीसाठी दरमहा एकत्रित र.रु.१०००/- (अक्षरी र.रू.एक हजार) या मानधनावर नेमणुक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९५ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.सुनिता गवळी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मसाभां/५/कावि/२७७/२०१४ दि. ०३/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील मायक्रोबायलॉजी लॅब विभागाने त्यांचे विभागात असणा-या Bactec MGIT 960 या उपकरणाची M/s.BD India Pvt.Ltd., यांचेकडून AMC करीता प्राप्त झालेले कोटेशन र.रु.१,१४,६०६/- व Biosafety Cabinet Type II या उपकरणाची AMC करीता M/s.Kim Microsystems यांनी सादर केलेल्या कोटेशन र.रु.१६,०००/- अधिक काम करतेवेळी आवश्यक लागणारे स्पेअर पार्टस याप्रमाणे करुन घेणेकामी निविदा न मागविता थेट पध्दतीने त्यांनी सादर केलेल्या कोटेशन दरानुसार येणा-या र.रु.१,३०,६०६/- (अक्षरी र.रू.एक लाख तीस हजार सहाशे सहा) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९६ विषय क्रमांक – ०४
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – औ.प्र.संस्था मोरवाडी
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.औप्रसं/१/कावि/२००/२०१४ दि. ०७/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी कडील सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रकातील छपाई या लेखाशिर्षावरील तरतुद र.रु.७५,०००/- लेखन साहित्य लेखाशिर्षावर तसेच वाहन निर्वाह लेखाशिर्षामधुन र.रु.४००००/- व प्रवासभत्ता लेखाशिर्षामधुन र.रु.५०००/- अशी एकुण र.रु.४५०००/- प्रशिक्षणापोटी खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९७ विषय क्रमांक – ०५

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – औ.प्र.संस्था कासारवाडी

सुचक – मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.औप्रसंमु/१/कावि/८८/२०१४ दि. ०७/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडीकडील सन २०१३-१४ चे सुधारित अंदाजपत्रकामधील पुस्तके शिलकी सामान लेखाशिर्षामधील र.रू.६६,०००/- बोनस तथा सानुग्रह अनुदान लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९८ विषय क्रमांक – ०६

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – आरोग्य मुख्य कार्यालय

सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.अतुल शितोळे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आ.मु.का./३/कावि/२३१/२०१४ दि. ३०/०४/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.स्थायी समिती ठराव क्र.१४९८ दिनांक २१/८/२००७ व सदर ठरावास दिनांक ४/९/२००७ चे दुरुस्तीनुसार नमुद करणेत आलेले "टाटा २५६१" चासीज ऐवजी "टाटा २५१६" चासीज अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६७९९ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.शांताराम भालेकर अनुमोदक – मा.आशा शेंडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/लेखा/१/कावि/५५२/२०१४ दि. ०६/०५/२०१४.

विषय - मुंबई पुणे रस्ता दापोडी ते पिंपरी चौक कर्बस्टोन, फुटपाथ, रस्ता इ. देखभाल व दुरुस्ती करणे.

विषय क्रमांक ०७ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०० विषय क्रमांक – ०८

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – माहिती व जनसंपर्क

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.सुनिता गवळी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/६/कावि/१२४/२०१४ दि. ०६/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महात्मा बसवेश्वर जयंती दि.२ मे २०१४ रोजी असल्याने सदर जयंतीचे औचित्य साधून दि.३०/४/२०१४ ते १/५/२०१४ या कालावधीत व्याख्याने, विविध कार्यक्रमांचे आयोजन कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी व जिजाऊ

सांस्कृतिक भवन, मोहननगर, चिंचवड याठिकाणी करण्यात आलेले आहे. याकामी थेट पध्दतीने अंदाजे र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख) इतका खर्च अपेक्षित असल्याने या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०१ विषय क्रमांक – ०९
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – माहिती व जनसंपर्क
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.प्रसाद शेट्टी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.माजसं/६/कावि/१३१/२०१४ दि. ०६/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने माहे फेब्रुवारी २०१४ ते मार्च २०१४ या कालावधीत विविध विकास कामांचे भुमीपुजन, चिखली येथिल ईडब्लुएस गृह प्रकल्पास मा.सचिव, अनिता अग्निहोत्री, गृहनिर्माण संस्था, भारत सरकार यांच्या भेटीचे व्हिडीओ शुटिंग करण्यात आले होते. तसेच मनपाच्या आकुर्डी व अन्थोनी गार्डन नेहरूनगर पिंपरी येथील अतिक्रमण कारवाई, मा.स्थायी समिती सभापती यांची निवड तसेच मनपाच्या विविध ठिकाणच्या भंगार मालाचे व्हिडीओ शुटिंग मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी, सांगवी, पुणे-२७. यांच्याकडून (मे.रामा व्हिजन, थेरगांव यांच्याकडील जुन्या दराने) करुन घेण्यात आलेले आहे. त्याकरीता र.रु.१६,८००/- (अक्षरी र.रु.सोळा हजार आठशे) इतका खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०२ विषय क्रमांक – १०
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – क्रीडा विभाग
सुचक – मा.अतुल शितोळे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/१४/२०१४ दि. २५/०२/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा दिनांक ७/५/२०१४ रोजी ठराव क्र. ८५ नुसार, मनपाच्या २१ व्यायामशाळांकरीता सन्मा.नगरसदस्य यांनी व अग्निशमन विभागातील कर्मचा-यांचे व्यायामशाळांकरीता विविध प्रकारचे व्यायामशाळा साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२०,१३,२९०/- ( अक्षरी र.रु.वीस लाख तेरा हजार दोनशे नव्वद फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता व सदर व्यायामशाळा साहित्य खरेदीची कार्यवाही मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई निविदा नोटीस प्रसिध्द करुन कार्यवाही करणेस व सदरचे विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०३ विषय क्रमांक – ११
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – क्रीडा विभाग
सुचक – मा.संध्या गायकवाड अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/२०९/२०१४ दि. १०/०३/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.क्रिडा समिती सभा दिनांक ७/५/२०१४ रोजी ठराव क्र. ८६ नुसार, जिल्हास्तर शालेय क्रीडास्पर्धा २०१३-१४ मधील ४७ खेळ प्रकारच्या स्पर्धांपैकी ४० खेळ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन म.न.पा. क्रीडा विभाग यांनी केल्याने उर्वरित ७ खेळ प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन म.न.पा. परिसरातील ६ खाजगी शाळांकडे सोपविल्याने त्याकामी त्यांना प्रस्तावात नमुद प्रमाणे त्यांच्या नावापुढे नमूद केलेप्रमाणे एकूण र.रु.८०,४४०/- मंजूर करणेस व त्यांचेकडून प्राप्त झालेल्या देय खर्चाच्या बीलातील रक्कम व मंजूर रक्कम यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम त्यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०४ विषय क्रमांक – १२
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.बाळासाहेब तरस अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/नि/४ड/कावि/२४७/२०१४ दि. ०७/०५/२०१४.
विषय - प्रभाग क्र.४७ काळेवाडी येथील पवना नदीस अय्यप्पा मंदिराजवळ नव्याने घाट बांधणे.

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०५ विषय क्रमांक – १३
दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.विनय गायकवाड
संदर्भ:- मा.विकास अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.वि/मुका/५/कावि/१८३/२०१४ दि. ०७/०५/२०१४.

मा. विकास अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/१३-१४ मधील अ.क्र.१८ अन्वये, बिजलीनगर उपविभागातील प्र.क्र.२०, २१ व २२ मधील रस्त्यावरील दिवाबत्ती व्यवस्थेचे केबल पोल व फिटींगची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.मनिकॉम इलेक्ट्रीकल (नि.र.रू.११,२४,८५७/- [अक्षरी र.रू.अकरा लाख चोविस हजार आठशे सत्तावन्न] पेक्षा ३३.३३२ **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०६ विषय क्रमांक – १४

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – विद्युत मुख्य कार्यालय

सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.बाळासाहेब तरस

संदर्भ:- मा.विकास अभियंता (वि/यां) यांचे पत्र क्र.वि/मुका/५/कावि/१८४/२०१४ दि. ०७/०५/२०१४.

मा. विकास अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत मुख्य कार्यालयाकडील नि.नो.क्र.९/१३-१४ मधील अ.क्र.४९ अन्वये, प्रभाग क्र.१८ किवळे विकासनगर मधील किवळ्यापासून औंधरावेत रोडने बापदेवनगर सिध्दीविनायक कॉलनी दरम्यानचा नाल्याच्या बाजूने नव्याने तयार होणा-या १८ मी. डी.पी. रस्त्यावर दिवाबत्ती व्यवस्था करणेकामी मे.रूपलक्ष्मी इलेक्ट्रिकल्स (नि.र.रू. २१,३३,५४९/- [अक्षरी र.रू.एकवीस लाख तेहतीस हजार पाचशे एकोणपन्नास] पेक्षा १९.००० % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०७ विषय क्रमांक – १५

दिनांक – १३/०५/२०१४ विभाग – विद्युत मुख्यालय

सुचक – मा.प्रसाद शेट्टी अनुमोदक – मा.रमा ओव्हाळ

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वि/मुका/तां/६५७/२०१४ दि. ०८/०५/२०१४.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील नवीन महापालिका सभागृहासाठी वापरात असलेल्या दोन्ही लिफ्टचे सन २०१४-१५ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीचे काम उत्पादीत कंपनी मे.कोने इलेव्हेटर इंडीया प्रा.लि. यांचेकडुन निविदा न मागविता थेट पद्धतीने परंतु रितसर करारनामा करुन करुन घेणेस व त्यापोटी येणारा खर्च र.रु. १,४४,३६६/- (अक्षरी र.रू.एक लाख चव्वेचाळीस हजार तीनशे सहासष्ट) प्राप्त झालेल्या कोटेशननुसार मे.कोने इलेव्हेटर इंडीया प्रा.लि. यांस आगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६८०८ विषय क्रमांक – १६

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाय.सी.एम.रुग्णालयामध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना लागू करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या अन्य रुग्णालय व दवाखान्यांमध्येही पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी रेशनकार्डधारक

नागरिकांना मोफत उपचार उपलब्ध करुन देणेकामी मा.महापालिका सभेमध्ये ठराव करणेत आलेला आहे. सदर दि.०१/०५/२०१४ पासून लागू करण्यात आलेल्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून केसपेपरसाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येऊ नये. तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात व दवाखान्यातील मोफत वैद्यकीय उपचार योजनेअंतर्गत केसपेपरसाठी आकारण्यात येणारे शुल्क ही पिंपरी चिंचवड शहरातील पिवळे व केसरी रेशनकार्डधारक नागरिकांकडून न घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८०९ विषय क्रमांक – १७

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती सभापती यांचेकडील मनपा वाहन क्र.एम.एच.१४ एई ८५०० (करोला) या वाहनास ५ नविन टयुबलेस टायर बसविणे आवश्यक असून सदर टयुबलेस टायरसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८१० विषय क्रमांक – १८

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव –

दापोडी ते निगडी या रस्त्यावर लवकरच बीआरटीएस बस सेवा सुरु करणेचे नियोजन आहे. सदर रस्त्यावर दापोडी येथे FOB (पादचारी पूल) बांधणेकामी मनपाचे सन २०१४-१५ चे अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे. तसेच बस टर्मिनल/डेपो बांधणेकामी भारत सरकरकडून अनुदान प्राप्त झाले आहे. सदर कामे करणेसाठी यामधील तज्ञ तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे आवयक आहे. त्यानुसार विषयांकित कामासाठी व्हेक्टर डिझाईन यांची नेमणूक करणेस तसेच मनपाच्या प्रकल्प सल्लागारांचे यादीमध्ये त्यांचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८११ विषय क्रमांक – १९

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

मनपा कार्यक्षेत्रात नविन प्रभाग कार्यालयांकरिता आवश्यक फर्निचर साहित्य खरेदी कामी ई.नि. सु.क्र.४७/२०१३-१४ नुसार निविदेतील प्राप्त लघुत्तम दरानुसार १) मे.रेखा इंजि.वर्क्स यांचेकडून आयटम क्र.३,४,५ व ६ साठी, २) मे.निर्मिती इंजि.कार्पो. यांचेकडून आयटम

क्र.१,३,४,५ व ६, ३) मे.एम.पी.एल. इंजिनिअर्स यांचेकडून आयटम क्र.२ खरेदी करण्यात येणार असून पुढील दोन वर्षे कालावधीत याप्रमाणे आवश्यकतेनुसार साहित्य संबंधित ठेकेदाराकडून ( मनपाच्या विविध कार्यालये, दवाखाने, रुग्णालये, शाळा इ. विभागांसाठी ) खरेदी करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८१२ विषय क्रमांक – २०

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील लोकसंख्या व त्या अनुषंगाने उपलब्ध असलेले अन्नधन्य वितरण विभागाकडील अधिकारी/कर्मचारी संख्या यांचा विचार करता पिंपरी चिंचवड शहरातील शिधापत्रिकांबाबत नवीन/दुबार शिधापत्रिका देणे तसेच शिधापत्रिकांच्या अनुषंगाने इतर बदल करणेसाठी महा-ई-सेवा कंपनीचे अधिकृत केंद्रामार्फत शिधापत्रिकांबाबतचे सर्व प्रकारचे शासनाने निश्चित केलेले शुल्क आकारुन अर्ज स्विकारणे व पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे तसेच परिमंडळ कार्यालयाकडून कार्यवाही पूर्ण झालेनंतर तयार शिधापत्रिका व दाखले अर्जदारास विहीत मुदतीत उपलब्ध करुन देणे इ. कामासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका इमारतीमध्ये सी.एफ.इन्फोसिस कंपनी प्रा.लि. चालवित असलेल्या जागेत शिवशक्ती स्वयंरोजगार संस्थेस अटी शर्तीनुसार त्यांचा पुर्वानुभव विचारात घेता त्यास पाच वर्षे कालावधीकरीता यापूर्वीच्या अटी शर्तीनुसार मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८१३ विषय क्रमांक – २१

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने व अंदाजपत्रक पुस्तकातील पान क्र. १४० अनु.क्र.१४६ नुसार मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ५७५०, विषय क्रमांक ४७, दिनांक २८/०१/२०१४ मधील सल्लागार या शब्दाऐवजी वास्तुविशारद नेमणूक करणे असा फेरबदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८१४ विषय क्रमांक – २२

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

अशोक काशिनाथ पवार, ऑफीस १९, २० दुसरा मजला, हायवे टॉवर्स, चिंचवड १९ यांस मनपाच्या आर्कीटेक्ट पॅनेलवर नेमण्यास व त्यांस आर्कीटेक्चर विषयक व लँन्डस्केपिंगची कामे आवश्यकतेनुसार वेळोवेळी देणेस व त्याकामी होणारी फी आर्कीटेक्ट कौन्सिलच्या नियमानुसार वेळोवेळी अदा करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.
सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८१५ विषय क्रमांक – २३

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.सुनिता गवळी अनुमोदक – मा.शांताराम भालेकर

संदर्भ:- मा.सुनिता गवळी, मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव –

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९२ मधील तरतुदीनुसार मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेने शिलकी रकमा राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेवीत गुंतवणूक करण्याची तरतूद आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.४५० दि.०२/०५/२०१२ अन्वये शिलकी रकमांची वेळेत गुंतवणूक होणेचे दृष्टीने व पुर्नगुंतवणूक वेळेत होणेचे दृष्टीने मा.अध्यक्ष स्थायी समिती यांना गुंतवणूकीबाबत अधिकार प्रदान केलेले आहेत. त्यानुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात मा.अध्यक्ष स्थायी समिती यांचे शिफारशीनुसार व मा.आयुक्त यांनी मुदत ठेवीत राष्ट्रीयकृत बँकेत केलेल्या गुंतवणूकीस व पुर्नगुंतवणूकीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८१६ विषय क्रमांक – २४

दिनांक – १३/०५/२०१४

सुचक – मा.रमा ओव्हाळ अनुमोदक – मा.विनय गायकवाड

संदर्भ:- मा.रमा ओव्हाळ, मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकामध्ये प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( महेशदादा किसन लांडगे )
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/ ४१६ /२०१४
दिनांक - १३/०५/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना